2 3 MAR 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सजग मतदार निर्मितीत विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची

## राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांची शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सजग मतदार निर्माण करण्याच्या दृष्टीने विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची असून, त्यांनी अभ्यासक्रम निर्मितीसह विविध उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी व्यक्त केली. त्यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन गत बैठकीचा आढावा घेण्यासह निवडणूक प्रक्रियेमध्ये युवकांचा सहभाग वाढवण्यासाठी कोणते उपक्रम राबविता येतील, या दृष्टीने चाचपणी केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित बैठकीत बोलताना राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

देशपांडे म्हणाले, सर्वसाधारणपणे विद्यार्थिदशेपासूनच निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी, या उद्देशाने विद्यापीठीय व्यवस्थेकडून निवडणूक आयोगाच्या मोठ्या अपेक्षा आहेत. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम आगामी शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित होईल, या दृष्टीने प्रयत्न करावेत. अभ्यासक्रम तयार झाल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या माध्यमातून विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे देशभरातील विद्यापीठांतही हा अभ्यासक्रम लागू करण्यासाठी राज्य आयोगामार्फत प्रयत्न करण्यात येतील.

संलग्नित महाविद्यालयांतूनही इलेक्टोरल लिटरसी क्लब तथा डेमॉक्रसी क्लब स्थापन करण्याच्या प्रक्रियेला चालना देण्याचा प्रयत्न करावा. शिवाजी विद्यापीठाने निडणूक प्रक्रिया, लोकशाही तथा मतदार जागृतीच्या अनुषंगाने विविध परिसंवाद व वेबिनार घेतले, ही स्तुत्य बाब आहे, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी देशपांडे यांना शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया व मतदार जागृतीच्या अनुषंगाने राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी लोकशाही दिन, मतदार दिवस या अनुषंगाने विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून घेण्यात आलेले परिसंवाद व विविध स्पर्धा यांची माहिती दिली.

कोल्हापूरचे उप-जिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, पन्हाळा प्रांताधिकारी तथा देशपांडे यांचे संपर्क अधिकारी अमित माळी, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

2 3 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दत्ता देशमुख बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे लोकशिक्षक

## प्रा. विठ्ठल शेवाळे; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

टेंबलाईवाडी, ता. २२ : दत्ता देशमुख बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे लोकशिक्षक होते, असे प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या दत्ता देशमुख अध्यासनातर्फे आयोजित 'दत्ता देशमुख : नेतृत्व आणि कर्तृत्व' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अतुल दिघे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.

प्रा. शेवाळे म्हणाले, 'दत्ता देशमुख केवळ निवडणूकप्रसंगी नव्हे, तर प्रत्येक अधिवेशनापूर्वी मतदारसंघाचा दौरा करायचे. लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्याबाबत विधानसभेत



आवाज उठवायचे. त्यामुळे लोकांचे वास्तव व खरेखुरे प्रश्न मांडले जात होते. त्यांनी राजकीय जीवनात कधीच विरोधासाठी विरोध केला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यसभेवर निवडून देण्यामध्ये त्यांनी व व्ही. एन. पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.'

दिघे म्हणाले, 'देशमुख बहुजनांच्या संघर्ष प्रक्रियेतून तयार झालेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे कार्य आणि कर्तृत्व पुस्तक रूपाने लोकांसमोर येणे आवश्यक आहे.'



**टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. विठ्ठल शेवाळे. शेजारी अतुल दिघे, डॉ. भारती पाटील, डॉ. किशोर खिलारे, बाबूराव तराळी.**

बाबूराव तराळी, डॉ. रवींद्र भणगे, प्रा. अनिल मोहिते, डॉ. अश्विनी पाटील, प्रा. मिलिंद सावंत उपस्थित होते. किरण शिंदे, शोभा पाटील, वैष्णवी कुंभार, भाग्यश्री मर्दाने, विद्या कांबळे यांनी संयोजन केले. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

तरूण भारत

# 'कॉ. दत्ता देशमुख बहुआयामी व्यक्तिमत्वाचे लोकशिक्षक'

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कॉ. दत्ता देशमुख यांचे जीवन म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय चळवळीचा इतिहास आहे. समोरच्या व्यक्तीचे प्रथम ऐकून घेऊन मग आपले मत मांडणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे ते लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनातर्फे आयोजित 'कॉ. दत्ता देशमुख: नेतृत्व आणि कर्तृत्व" या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कॉ. अतुल दिघे होते.



**व्याख्यानात बोलताना प्रा. विठ्ठल शेवाळे.**

प्रा. शेवाळे म्हणाले, 'दत्ता देशमुख केवळ निवडणूक प्रसंगी नव्हे, तर प्रत्येक अधिवेशनाच्या अगोदर मतदारसंघाचा दौरा करत होते. लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्याबाबत विधानसभेत आवाज उठवत होते. त्यामुळे लोकांचे वास्तव व खरेखुरे प्रश्न मांडले जात होते. त्यांनी आपल्या राजकीय जीवनात कधीच विरोधासाठी विरोध केला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यसभेवर निवडून देण्यामध्ये त्यांनी आणि व्ही. एन. पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अध्यक्ष्यस्थानावरून बोलताना कॉ. अतुल दिघे म्हणाले, दत्ता देशमुख हे बहुजनांच्या संघर्ष प्रक्रियेतून तयार झालेले व्यक्तिमत्व आहे. त्यांचे कार्य आणि कर्तृत्त्व पुस्तक रूपाने लोकांसमोर येणे आवश्यक आहे." अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले. यावेळी कॉ. बाबुराव तराळी, डॉ. रवींद्र भणगे, प्रा. अनिल मोहिते, डॉ. अश्विनी पाटील, प्रा. मिलिंद सावंत, प्रा. साक्षी गावडे, किरण शिंदे, शोभा पाटील, वैष्णवी कुंभार, भाग्यश्री मर्दाने, विद्या कांबळे आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'कॉ. देशमुख बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे लोकशिक्षक'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कॉ. दत्ता देशमुख यांचे जीवन म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय चळवळीचा इतिहास आहे. समोरच्या व्यक्तीचे प्रथम ऐकून घेऊन मग मत मांडणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे ते लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कॉ. दत्ता देशमुख अध्यासनातर्फे आयोजित 'कॉ. दत्ता देशमुख : नेतृत्व आणि कर्तृत्व' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कॉ. अतुल दिघे होते. प्रा. शेवाळे म्हणाले, देशमुख केवळ निवडणूक प्रसंगी नव्हे तर प्रत्येक अधिवेशनाच्या अगोदर मतदारसंघाचा दौरा करीत. लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्याबाबत विधानसभेत आवाज उठवत होते. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. याप्रसंगी कॉ. बाबुराव तराळी, डॉ. रवींद्र भणगे, प्रा. अनिल मोहिते, डॉ. अश्विनी पाटील उपस्थित होते.

23 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याच्या शाश्वत स्त्रोतांचे जतन करू

## जलदिनी संकल्प : राजाराम तलावाचे पालकमंत्र्याकंडून पूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक जल दिनानिमित्त पालकमंत्री सतेज पाटील यांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठ परिसरातील राजाराम तलाव येथे मंगळवारी पाणी पूजन करण्यात आले. यावेळी पाण्याचा अपव्यय टाळण्याचा आणि स्त्रोतांच्या शाश्वत संरक्षणासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प करण्यात आला.



शिवाजी विद्यापीठ परिसरातील राजाराम तलाव येथे मंगळवारी जागतिक जल दिनानिमित्त पालकमंत्री सतेज पाटील यांच्या उपस्थितीत पाणी पूजन करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता महेश सुर्वे उपस्थित होते.

जलसंपदा विभाग, बिल्डर असोसिएशनतर्फे १६ ते २२ मार्च हा जलजागृती सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. रोटरी क्लब, अर्थमुव्हर्स असोसिएशन, बिल्डर असोसिएशन, आर्किटेक्ट असोसिएशन यांच्यातर्फे सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पालकमंत्री पाटील यांच्याहस्ते राजाराम तलावातील पाणी पूजनाने सप्ताहाची सांगता झाली.

बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष बापू कांडेकर यांनी राजाराम तलावाच्या परिसरात वृक्ष लागवड केल्याचे सांगितले. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव एन. व्ही. शिंदे यांनी जल, जंगल व जमिनीचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमास पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता महेश सुर्वे, डॉ. संदीप पाटील, रोहित बांदिवडेकर, तानाजी धामणकरउपस्थित होते.

2 3 MAR 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरला हवामान बदलाची झळ?

कोल्हापूर : आशिष शिंदे

हवामान बदलाचे गंभीर संकट जगासमोर काळ बनून उभे आहे. दुष्काळ, महापूर आणि चक्रीवादळासारख्या प्रलयकारी घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. पश्चिम महाराष्ट्रालाही याचा तडाखा बसला आहे. सधन आणि निसर्गसंपन्न समजल्या जाणाऱ्या कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांना हवामान बदलाची झळ बसण्याची शक्यता आहे. जल, ऊर्जा, पर्यावरण परिषदेच्या नुकत्याच आलेल्या अहवालातून ही बाब समोर आली आहे.

गेल्या पाच दशकांमध्ये कोल्हापूरमध्ये महापूर, वादळे, उष्णतेच्या लाटा व वीज कोसळण्याच्या १०१ घटना घडल्याचे भारतीय हवामान संशोधन आणि सेवा कार्यालयाकडील आकडेवारी सांगते. १९६९ ते २०१९ या कालावधित कोल्हापूरला २८ वेळा पुराचा फटका बसला आहे. तर वीज कोसळण्याच्या २३ घटना घडल्या आहेत. तसेच १९८१ ते २०१० या कालावधीत १३ वेळा वादळांचा तडाखा बसला आहे.

जल, ऊर्जा, पर्यावरण परिषदेच्या हवामान तीव्रता निर्देशांकानुसार, आसाम, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक आणि बिहारला महापूर, दुष्काळ आणि चक्रीवादळाचा फटका बसण्याचा धोका आहे. हवामान बदलाचा सर्वाधिक फटका बसणाऱ्या राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. या सर्व हवामान बदलांचा परिणाम कोल्हापूरलाही सहन करावा लागण्याची शक्यता पर्यावरण तज्ज्ञांनी व्यक्त केली.

## पाच दशकांत २८ वेळा महापूर, १३ वादळे, ४१ वेळा उष्णतेच्या लाटांचा फटका



### जागतिक हवामान दिन विशेष

**गेल्या पाच दशकांत घडलेल्या नैसर्गिक आपत्ती**

| जिल्हा | पूर/महापूर | उष्णतेची लाट | वीज कोसळणे | वादळ |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर | २८ | ४१ | २३ | १३ |
| मुंबई शहर | ११६ | ३१ | ५१ | १६ |
| सांगली | १६ | २६ | १४ | ९ |
| सातारा | २३ | २४ | २० | १२ |
| सोलापूर | १८ | २४ | १८ | ७ |
| रत्नागिरी | ३६ | २८ | ४७ | १३ |

> वाढत्या तापमानाच्या झळा सध्या कोल्हापूरकर सहन करत आहेत. हवामान बदलाचे गंभीर परिणाम टाळण्यासाठी वेळीच ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. यासाठी कार्बन उत्सर्जन कमी करून ग्रीन बेल्ट विकसित करणे अत्यावश्यक आहे.
>
> **– डॉ. आसावरी जाधव, पर्यावरण विभागप्रमुख**

### कोल्हापूरला दुष्काळाचा धोका कमी

हवामान तीव्रता तालिकेनुसार सांगली, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांना कोल्हापूरच्या तुलनेत दुष्काळाचा सर्वाधिक धोका आहे. कोल्हापूरकरांनी वेळीच सावध होऊन निसर्ग संरक्षणासाठी प्रभावी प्रयोग राबवणे गरजेचे आहे.

### उष्णतेच्या लाटेचा धोका

वाढत्या उष्म्यामुळे कोल्हापूरकर अक्षरशः हैराण झाले आहेत. कोल्हापुरात मार्च महिन्यात पारा ३९.५ अंशांपर्यंत जात आहे. गेल्या ५० वर्षांमध्ये तब्बल ४१ वेळा उष्णतेच्या लाटेचा फटका कोल्हापूरला बसला आहे. थंडीत नीचांकी तापमान नोंदवले गेल्याने तर उन्हाळ्यात उच्चांकी तापमान अशा नव्या नोंदीमुळे हवामान बदलाची भीती व्यक्त केली जात आहे.

### यंदाची जागतिक हवामान दिनाची थीम

वेळीच मिळालेली चेतावणी आणि त्वरित कारवाई ही यंदाच्या जागतिक हवामान दिनाची संकल्पना आहे. हवामानात होणाऱ्या बदलांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक हवामान दिन साजरा केला जातो.

पुढारी

# विवेकानंद कॉलेजमध्ये जल दिन, जागतिक वन दिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक जलदिन आणि वन दिवस साजरा झाला.

याप्रसंगीप्रा.डॉ.मधुकरबाचुळकर यांनी भारतातील वनाची सद्यस्थिती या विषयावर व्याख्यान दिले. ते म्हणाले, वन म्हणजे फक्त काही झाडे नाहीत. इतर वन्यजीव आहेत त्यांचे संरक्षण करणे, वनांची तोड थांबवणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात पाण्याची बचत महत्त्वाची ठरणार आहे. प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.बी. टी.दांगट यांनी केले. प्रा. स्नेहल वाडकर यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. भैरू शिंदे यांनी आभार मानले.

23 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलस्रोतांचे संरक्षण करूया

## पालकमंत्री सतेज पाटील; राजाराम तलावावर जल दिन सप्ताहाची सांगता

सकाळ वृत्तसेवा

टेंबलाईवाडी, ता. २२ : सिंचनासाठी पाणी वापरासंबंधी कायदे व नियमांबाबत लाभधारकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय टाळताना जलस्रोतांच्या शाश्वत संरक्षणाचा संकल्पही जलदिनाच्या निमित्ताने करूया, असे आवाहन पालकमंत्री सतेज पाटील यांनी आज केले.

जलसंपदा विभागांतर्गत कोल्हापूर पाटबंधारे मंडळाच्या वतीने झालेल्या जल दिन सप्ताहाची सांगता आज त्यांच्या प्रमुख उपस्थितीत राजाराम तलाव येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान. राजाराम तलाव सुशोभिकरणाचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर केला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, रोटरी क्लब, अर्थमुव्हर्स असोसिएशन, कोल्हापूर बिल्डर असोसिएशन, आर्किटेक्ट असोसिएशन आदी संस्थच्या सहभागातून सप्ताह साजरा झाला. जलपूजनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. कार्यकारी अभियंता रोहित बांदिवडेकर यांनी प्रास्ताविक केले.. उपकार्यकारी अभियंता तानाजी धामणकर यांनी जलप्रतिज्ञेचे वाचन केले. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव व्ही.एन. शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष बापू कोंडेकर यांनी राजाराम तलाव परिसरातील वृक्ष लागवडीची माहिती दिली. पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता महेश सुर्वे यांनी अध्यक्षीय समारोप केला. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : जल दिन सप्ताहाची सांगता मंगळवारी राजाराम तलाव येथे झाली. या वेळी जलपूजन करताना पालकमंत्री सतेज पाटील. शेजारी व्ही. एन. शिंदे, महेश सुर्वे, रोहित बांदिवडेकर, डॉ. संदीप पाटील आदी.

23 MAR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील अध्यासनांना अच्छे दिन

## राज्य सरकारकडून राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्र, संग्रहालय संकुल यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशालेला १० कोटीचा निधी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात जवळपास दीड डझन अध्यासन केंद्रे आहेत. नियमानुसार अनेक अध्यासनांना युजीसीकडून मिळणारे अनुदान बंद झाले आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या अनुदानाच्या प्रतीक्षेत ही अध्यासने होती. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये विद्यापीठातील राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्र व संग्रहालय संकुल आणि यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रशालेला १० कोटी रूपये मंजूर केले आहेत. तसेच राज्यातील सर्व विद्यापीठात महापुरूषांच्या नावाने सुरू असलेल्या अध्यासनाला प्रत्येकी ३ कोटी रूपये देण्याचे जाहीर केले आहे. विद्यापीठ प्रशासनाने महापुरूषांच्या अध्यासनाचा प्रस्ताव पाठवून पाठपुरावा केला तर सर्वच अध्यासनाला अच्छे दिन येणार आहेत.

अध्यासनाच्या माध्यमातून संशोधन करण्यासाठी युजीसीकडून अनुदान दिले जाते. परंतू युजीसीचे अनुदान बंद झाल्यानंतर



संबंधीत अध्यासनाला राज्य सरकारने अनुदान दिले पाहिजे, हा नियम आहे. शिवाजी विद्यापीठ गेल्या कित्येक वर्षापासून अध्यासनांना अनुदान मिळावे, यासाठी प्रयत्नशील होते. सातत्याच्या पाठपुराव्यामुळे विद्यापीठातील दोन अध्यासनांना १० कोटी मंजूर केले आहेत. ही स्वागतार्ह गोष्ट आहे. परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान महावीर, पंडीत नेहरू, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज मराठा, संत तुकाराम, अहिल्यादेवी होळकर, विठ्ठल रामजी शिंदे, लोकनेते बाळासहेब देसाई, कॉम्रेड दत्ता देशमुख, आण्णाभाऊ साठे, शारदाबाई पवार अध्यासनांसह अन्य अध्यासनांचा प्रस्ताव विद्यापीठाने राज्य शासनाकडे तातडीने पाठवून पाठपुरावा करण्याची गरज आहे. गेल्या कित्येक वर्षापासून सर्वच अध्यासनांचे कामकाज विद्यापीठ स्वनिधितून सुरू आहे. सरकारकडून अनुदान मिळाले तर या अध्यासनाचा मुख्य उद्देश साध्य करणे सहज सोपे होईल. तसेच महापुरूषांच्या जीवनाचा परिपूर्ण अभ्यास करण्यासही आर्थिक अडचण भासणार नाही. तसेच विद्यापीठाच्या स्वनिधितून होणारा आर्थिक भारही कमी होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

### बहुतांश अध्यासनांचा खर्च स्वनिधितून

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे अनुदान मध्यंतरी दहा वर्षे मिळालेले नव्हते. सध्या या केंद्राला युजीसीने दोन कोटीचे अनुदान दिले आहे. ही स्वागतार्ह गोष्ट आहे, परंतु गेल्या कित्येक वर्षापासून सर्व अध्यासनाचा खर्च विद्यापीठ स्वनिधीतून केला जातो. परंतु याला शासनाच्या अनुदानाची जोड मिळाली तर संशोधनाला चालना मिळेल.

### महापुरूषांच्या अध्यासनाचे प्रस्ताव पाठवले तर आणखी ३० कोटी मिळतील

सरकारने राज्यातील सर्व विद्यापीठातील थोर समाजसुधारक, महनीय व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्र स्थापन करण्याचे धोरण निश्चित झाले आहे. अशा प्रत्येक केंद्रासाठी ३ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. राज्य सरकारच्या सूचनांप्रमाणे विद्यापीठातील महापुरूषांच्या अध्यासनांचे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा केला तर जवळपास आणखी ३० कोटी रूपये विद्यापीठाला मिळतील.

- थोर समाज सुधारक व महनीय व्यक्तींच्या अध्यासनाला प्रत्येकी ३ कोटी निधी मिळणार
- सध्या बहुतांश अध्यासनांची वाटचाल विद्यापीठ निधीतून

### या अध्यासनामुळे संशोधनाची संधी

छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू, पंडीत नेहरू, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, विठ्ठल रामजी शिंदे, गोडबोले, भगवान महावीर, संत तुकाराम, शारदाबाई पवार, छत्रपती शाहू महाराज मराठा, अहिल्यादेवी होळकर, लोकनेते बाळासाहेब देसाई, कॉम्रेड दत्ता देशमुख, आण्णाभाऊ साठे, स्त्री अभ्यास केंद्र, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण यासह अन्य अध्यासनांमध्ये संशोधन करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत असते.

### अध्यासनांना निधी मिळवण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने यापुर्वीच काही अध्यासनाचे प्रस्ताव राज्यशासनाला पाठवले आहेत. आता शासनाच्या सूचनेनुसार उर्वरीत अध्यासनांचे प्रस्ताव लवकरात लवकर शासनाला पाठवून पाठपुरावा केला जाईल. विद्यापीठातील अध्यासनांना जास्तीत जास्त निधी कसा मिळेल, यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे.

– कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे (शिवाजी विद्यापीठ)

2 3 MAR 2022 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'Network 24/7' bags first prize in Kolhapur, enters state competition

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The results of the preliminary rounds of the state-level amateur drama competition (Maharashtra Rajya Houshi Natya Spardha) have been announced and 'Network 24/7' of Kolhapur centre Merid India groups secured the first position.

## MAHARASHTRA RAJYA HOUSHI NATYA SPARDHA

Shivaji University Music and Drama department's 'Andhayug' secured second prize and has been selected for the statewide final round of the drama competition. 'Gagan Damama Bajyo' presented by Yuvak Mitra Mandal secured third prize from Kolhapur centre.

This is the 60th edition of the Rajya Natya Spardha and the preliminary round got conducted between February 23 and March 17 at Keshavrao Bhosale Natyagruh for Kolhapur centre. A total of 22 groups from Kolhapur took part in the competition where 22 plays were presented. Devidas Amonkar, Rajendra Patankar and Suhas Khandare were the judges for the competition.

This much awaited competition by theatre lovers was conducted after a gap of two years due to covid pandemic and received good response from the audience. Earlier, only 50% attendance was allowed for the competition. Recently, theatres were allowed to hold shows in full capacity.

TOI



Members from Network 24/7 team outside Keshavrao Bhosale Natyagruh